नरहरी आणि इतर

विरुद्ध

शंकर आणि इतर

<u>१९५०</u>

१३ ऑक्टोबर

(मेहर चंद महाजन, आर.एस.नाईक आणि खालिलझमान जे.जे.)

निर्णीत बाब प्राडन्याय (Res-judicata) – एकाच खटल्यातून उद्भभवनारे अनेक अपील- एकाच निर्णयाद्वारे निकाली काढलेले अपील – वेगळे केलेले हुकुमनामे- केवळ एका हुकुम्नाम्यातून अपील- अपील चालण्याची क्षमता- प्राडन्याय – कालमर्यादा कायदा कलम ५ – वेळेचा विस्तार – पुरेसे कारण – निर्णयांचा संघर्ष

'अ' ने मालमत्तेतील दोन तृतीयांश भाग ताब्यात घेण्यासाठी 'ब' आणि 'क' विरुद्ध दावा दाखल केला ज्यांनी त्यातील प्रत्येकी एक तृतीयांश भागावर दावा केला होता. हा दावा ट्रायल कोर्टाने मंजूर केला. ब आणि क यांनी वेगवेगळे दोन अपिले दाखल केली. (१) या अपिलांवर एकत्र सुनावणी झाली आणि एकाच न्यायनिर्णयाद्वारे त्यांचा निकाल करण्यात आला, परंतु वेगवेगळे हुकुम्नामे तयार करण्यात आले 'अ' ने यापैके एका हुकुमनाम्या विरुद्ध कालमर्यादेमध्ये पूर्ण न्यायलयीन शुल्क भरून अपील

दाखल केले आणि कालमर्यादा संपल्यानंतर दुसऱ्या हुकुमनाम्या विरुद्ध केवळ एक रुपये न्यायालयीन शुल्क भरून अपील दाखल केले. उच्च न्यायालयाने असे म्हटले की, 'अ' ह्याने वेगवेगळी अपिले, मुदतीत दाखल करावयास पाहिजे होती आणि ज्याअर्थी त्यापैके एक अपील कालमर्यादेच्या

(1) आय.एल.आर.२५ मद्रास ६५८

बाहेर दाखल केलेले होते, त्याअर्थी पहिले अपील हे प्राडन्यायने

प्रतिबंधित झाले होते (Barred by Res-Judicata).

सर्वोच्च न्यायालयाने असे ठरविले की, एकच दावा असल्याने आणि एकाच न्यायनिर्णयाद्वारे अपिले निकाली काढणेत आली असलेने दोन स्वतंत्र अपिले दाखल करणे आवश्यक नव्हते आणि अपिलांपैकी एक अपील वेळेत दाखल न झालेने प्रतिबंधित होते या वस्तुस्थितीमुळे दुसऱ्या अपिलाच्या चालू शकण्यावर कोणताही परिणाम झाला नव्हता आणि ह्या प्रकरणात प्राडन्यायाचा प्रश्न अजिबात उद्भवत नाही.

पुढे असे म्हटले गेले की, अश्या परिस्थितीत उच्च न्यायालयाने अपीलकर्त्याला मुदतीच्या कायद्याच्या कलम ५ चा लाभ न देणे चुकीचे होते कारण ह्या विषयावर निर्णयांमध्ये संघर्ष आहे.

सदर निकालात मिस्ट्रेस लछमी विरुद्ध मिस्ट्रेस भुली (ए.आय.आर. १९२७ लाहोर २८९) मधील निर्णयाचा उपयोग केला गेला तर अप्पा विरुद्ध कचाई बयान कुट्टी (ए.आय.आर.१९३२ मद्रास ६८९) चा संदर्भ घेण्यात आला.

संविधानाच्या अनुच्छेद ३७४(४) अंतर्गत उच्च न्यायलय हैद्राबादच्या निकालाविरुद्ध अपील. अपील क्रमांक २२ आणि २३ ऑफ १९५०.

गुलाम अहमद खान – अपीलकर्त्या करिता

उत्तरवादीं करिता कोणी वकील हजर नाही.

१९५० ऑक्टोबर १३ न्यायालयाचा न्यायनिर्णय दिला :-

न्यायमूर्ती नाईक :- ज्या दाव्यामधून ही अपिले उद्भवली आहेत तो दावा सर्वे क्रमांक २१४ या जमिनीच्या दोन तृती यांश हिश्याच्या जमिनीच्या ताब्यासाठी आणि दरम्यानच्या नफ्यासाठी होता. वादी अशा कथ्नांवरून ताबा मागतात की, सर्वे क्रमांक २१४ ही इनाम जमीन होती आणि कौटुंबिक प्रथेनुसार केवळ वरिष्ठ शाखेचे सदस्य म्हणून त्यांची होती तर प्रतिवादी कनिष्ट शाखेचे सदस्य आहेत. प्रतिवादींचे दोन संच आहेत प्रतिवादी क्रमांक १ ते ४ हे कुटुंबातील एका शाखेचे तर प्रतिवादी क्रमांक ५ ते ८ हे दुसऱ्या शाखेचे आहेत. प्रत्येक संच असा दावा करतो की, त्यांच्याकडे एक तृतीयांश जमीन आहे आणि कौटुंबिक मालमत्तेतील त्यांचा वाटा म्हणून त्यांनी ती मिळण्याचा हक्क आहे. फिर्यादी द्वारे कथन केलेल्या वरिष्ठ शाखेकडून विशेष ताब्यात घेण्याची प्रथा ते नाकारतात. ट्रायल कोर्टाने दावा मंजूर केला या हुकुम्नाम्याविरुद्ध प्रतिवादीच्या दोन गटांनी गुलबर्गा येथील सदर अदालत येथे दोन स्वतंत्र अपिले दाखल केली ज्यात प्रत्येकी एक तृतीयांश भागावर दावा केला गेला आणि प्रत्येकाने त्यांच्या वाट्याच्या मर्यादे पर्यंत न्यायालयीन शुल्क भरले. पहिल्या अपील कोर्टाने म्हणजेच सदर अदालतिने दोनीही अपिले मंजूर केली आणि वादीचा दावा तीस बहमन १३३८ फसली

रोजी एका निकालपत्राने नामंजूर केला आणि त्या निकालपत्राची प्रत दुसऱ्या अपिलाचे अभिलेखावर ठेवण्याचा आदेश केला. ह्या निकालपत्राच्या आधारे दोन हुकुमनामे तयार केले गेले. याचिकाकर्त्याने उच्च न्यायालयात दोन अपिले दाखल केली पहिले अपील २३ अबान १३४५ फसली रोजी दाखल करण्यात आले होते आणि त्यासोबत प्रतिवादी क्रमांक १ ते ४ यांच्या अपिलांमध्ये पारित केलेला हुकूमनामा जोडण्यात आला होता. नंतर १७ अझुर १३४६ फसली रोजी आणखी एक अपील दाखल करण्यात आले आणि त्यासोबत प्रतिवादी क्रमांक ५ ते ८ च्या अपिलामध्ये पारित केलेला हुकूमनामा जोडण्यात आलेला होता. हे नंतरचे अपील अपिलांच्या कालमर्यादेच्या कालावधीनंतर २९ दिवसांच्या उशिराने दाखल केले. हे अपील १ रुपये च्या मुद्रांक शुल्कावर दाखल करण्यात आले होते आणि त्यात एक नोंद घेण्यात आली होती की, ह्या पूर्वी दाखल केलेल्या अपिलात जे १३४७ फसली चे अपील क्रमांक ३३१ म्हणून नोंदवले गेलेले आहे त्या अपिलात संपूर्ण न्यायालयीन शुल्क भरले गेलेले आहे. अपिलांच्या सुनावणीच्या वेळी प्रतीवादींनी प्राथमिक आक्षेप घेतला होता की, दुसरे अपील, म्हणजे १३४६ फसलीचे क्रमांक ३३२ चे अपील कालमर्यादेच्या पलीकडे दाखल केलेले होते त्यामुळे ते चालू शकत नव्हते आणि जेंव्हा दुसरे अपील अशा प्रकारे फेटाळले जाते तेव्हा निर्णीत बाब प्राडन्यायाचे तत्व (Res-judicata) पहिल्या अपीलला म्हणजे १३४६ फसलीच्या क्रमांक ३३१ ला लागू होईल आणि त्यामुळे ते देखील नामंजूर व्हायला पाहिजे. उच्च न्यायाल्याने असे मत व्यक्त केले की, वादींनी कालमर्यादेच्या कालावधीत दोन्ही स्वतंत्र अपिले दाखल करायला हवी होती आणि

दुसरे अपील कालमर्यादेने प्रतिबंधित असलेने आणि ही बाब उभय पक्षी मान्य असलेने पहिले अपील देखील निर्णीत बाब प्राडन्यायाच्या तत्वाने अयशस्वी झाले. उच्च न्यायालयाने दोन्ही याचिका फेटाळल्या. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या विरोधात राज्याच्या न्यायिक समितीकडे दोन अपिले दाखल करण्यात अली आणि ते अपिले राज्य घटनेच्या अनुच्छेद ३७४(४) अंतर्गत आमच्यासमोर आहेत.

उच्च न्यायलयाने आपल्या निकालात जेठमल विरुद्ध रंग्लाल (१७ डी.एल.आर. ३२२) मध्ये दिलेल्या न्यायनिर्णयावर भर दिला. हे एक पैशाच्या वसुलीचे प्रकरण होते ज्यामध्ये फिर्यादी चा दावा अंशत निकाला काढण्यात आलेला होता आणि या न्यायनिर्णयावरून दोन्ही पक्षांनी अपिले दाखल केली होती, वादीने त्याचा दावा अंशतः फेटाळला गेला म्हणून तर प्रतिवादीने दावा अंशतः मंजूर केला म्हणून. पहिल्या अपील न्यायालयाने वादीचा दावा पूर्णपणे फेटाळला आणि प्रतिवादीचे अपील मंजूर केले आणि वादीचे अपील फेटाळले आणि दोन स्वतंत्र हुकुमनामे तयार केले. वादीने मात्र एकाच हुकुमनाम्याविरुद्ध अपील दाखल केले जो त्याच्या विरुद्ध पारित करणेत आला होता आणि त्या प्रकरणात असे ठरविण्यात आले की, निर्णीत बाब प्राडन्यायाचे (Res-judicata) चे तत्व त्यास लागू होते.

राज्याच्या न्यायिक समितीचा हा निकाल असला तरी उच्च न्यायालयाने, नंदलाल विरुद्ध मोहिउद्दिन अली खान (१), निझामुद्दीन विरुद्ध चतुर्भुज (२), गयाजी पंत विरुद्ध हबिबुद्दिन (३) आणि जगन्नाथ विरुद्ध सोनाजी (४) अशा अनेक प्रकरणात

असे म्हटले आहे की, जेंव्हा दावा एकच असेल आणि एकाच खटल्यातून दोन याचिका दाखल केल्या जातील तेंव्हा दोन याचिका दाखल करायची आवशकता नाही.

जरी उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये यापैकी काही न्यायनिर्णयांचा संदर्भ दिला असला तरी अपिलकर्ता या निकालांवर अवलंबून आहे असे केवळ म्हटले गेलेले आहे कदाचित मा. न्यायमूर्तींना असे वाटले असेल की, न्यायिक समितीच्या जेठमल विरुद्ध रंग्लाल (५) ह्या निर्णयामुळे त्यांना ह्या निर्णयांवर भाष्य करण्याची गरज नाही. बन्सीलाल विरुद्ध मोहनलाल (६) मध्ये राज्याच्या न्यायिक समितीचा नंतरचा निर्णय देखील आहे, ज्यामध्ये लाहोर उच्च न्यायालयाचा सुप्रचलीत आणि सर्वसमावेषक मिस्ट्रेस रश्मी विरुद्ध मिस्ट्रेस भुली ह्या खटल्यातील निकालाचा स्वीकार केला गेला होता. त्या लाहोर येथील दाव्यात एकाच विषयावरील दोन परस्पर विरोधी खटले एकाच पक्षामध्ये एकाच वेळी दाखल करण्यात आले होते तर आताच्या खटल्यामध्ये एकच दावा होता आणि एकच निकाल ट्रायल कोर्टने दिला होता आणि सदर अदालतीतील पहिल्या अपिलात देखील प्रतिवादीच्या दोन गटांनी दोन अपिले करून देखील एकच निकाल देण्यात आला होता.

उच्च न्यायालयात केलेल्या अपिलात वादी यांनी सर्व प्रतीवादीना उत्तरवादी म्हणून समाविष्ट केले आहे आणि त्यांच्या प्रार्थने मध्ये दोन्ही अपिलंचा समावेश आहे आणि त्यांनी संपूर्ण खटल्यासाठी एकत्रित न्यायालयीन शुल्क भरले आहे. जिथे एक खटला, एक निष्कर्ष आणि एक निर्णय झाला आहे, तिथे दोन हुकुमनामे जरी तयार

केले गेले असले तरी दोन अपिले दाखल करायची गरज नाही हे आता व्यवस्तीतपणे सिद्ध झालेले आहे.

(१) २२ डी.एल.आर.४०० (२) २३ डी.एल.आर.४५७

(३) २८ डी.एल.आर. १०९४ (४) २९ डी.एल.आर.१०८

(५) १७ डी.एल.आर.८२२ (६) ३३ डी.एल.आर. ६०३

न्यायमूर्ती टेकचंद यांनी वर नमूद केलेल्या मिस्ट्रेस लछमी विरुद्ध भुली (ए.आय.आर.१९२७ लाहोर २८९) मधील त्यांच्या विद्वत्तापूर्ण न्यायनिर्णयात असे निरीक्षण नोंदविली आहे की, निर्णायक घटक हा हुकूमनामा नसून वादग्रस्त विषय हा निर्णायक घटक आहे. त्यांनी निकालात पुढे नमूद केल्याप्रमाणे प्रतिबंधक कबुली (Estoppel) ही हुकुमनाम्याद्वारे निर्माण केली जात नाही तर ती केवळ न्यायनिर्णयद्वारेच निर्माण केली जाऊ शकते. जेंव्हा दोन खटले असतात तेंव्हा प्राडन्यायाचा प्रश्न उदभवतो. जरी दोन दावे असतील आणि त्या दाव्यांचा एकाच वेळी निकाल झाला तर तो निकाल आधीच्या दाव्यातला समजला जाऊ शकत नाही. ज्यावेळेला एकच दावा असतो त्यावेळेला प्राडन्यायाचा प्रश्नच उद्भभवत नाही. ह्या दाव्यात दोन्ही हुकुमनामे एकाच दाव्यात आणि एकाच निर्णयावरून तयार करण्यात आलेले असून आणि न्यायनिर्णयाचा विषय हा संपूर्ण दाव्याचा विषय आहे अशा परिस्थितीत प्राडन्यायाचे तत्व लावण्याचा प्रश्नच उदभवत नाही. केवळ त्याविरुद्ध दोन अपील दाखल झालेले होते किंवा त्या न्यायनिर्णयाची प्रत दोन वेगवेगळ्या अपिलांना लावलेली होती म्हणून तो न्यायनिर्णय प्रभावी राहू शकत नाही. अश्या परिस्थितीतील

दोन हुकुमनामे हे वस्तुतः एकच हुकूमनामा आहे त्याव्यतिरिक्त केवळ ह्या प्रश्नावर त्या न केवळ त्या राज्याच्या उच्च न्यायालयाच्या विविध निकालांमध्ये किंवा भारताच्या विविध उच्च न्यायालयांच्या निकालांमध्ये ह्या प्रश्नावर एक वाक्यता नाही ह्या कारणामुळे अपिलकारला कालमर्यादेच्या कायद्याच्या कलम ५ चा लाभ न देणे ही उच्च न्यायालयची चूक होती.

आपल्या युक्तिवादाच्या पुष्ट्यर्थ अपिलकाराच्या विद्वान वकिलांनी आप्पा विरुद्ध कचाई बयान कुट्टी (ए.आय.आर.१९३२ मद्रास ६८९) या निकालाचा आधार घेतला जो निकाल या खटल्यातील सर्व बाबींवर पूर्णतः लागू पडतो.

सबब आमचे मत असे आहे को, हे अपिले मंजूर करावीत आणि खटल्याच्या गुणवत्तेवर निर्णय घेण्यासाठी हे प्रकरण उच्च न्यायालयात पाठविले जावे. या अपिलांचा खर्च खटल्याच्या निकालांवर अवलंबूत असेल.

*अपिले मंजूर*

**<u>अस्वीकरण</u>**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल

आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".

x-x-x-x